**शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड येथील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करणार - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील** >> पान 2

**आदिती तटकरे यांच्या हस्ते सुवर्ण महोत्सवी गगनभरारी कार्यक्रमाचे उद्घाटन** >> पान 3

**बंद पडलेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात ग्रामस्थ पोहचले कार्यालयावर आधी सा.बा.विभाग नंतर नगर पालिकेवर धडकले** >> पान 4

**सुविचार**
स्वप्नं पूर्ण करण्यासाठी मेहनत करणे आवश्यक आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 217 ■ शुक्रवार, दि. 21 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**क्रिकेटपटू, उद्योगपती, अभिनेता कोणालाच नाही सोडलं; 'या' सुप्रसिद्ध अभिनेत्रीच्या अफेअरनं बॉलिवूड हादरलं** आतील पान

# तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांसाठी ग्रामविकास, पर्यटन विभागाने सुधारित नियमावली करावी : मुख्यमंत्री फडणवीस

## श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी आणि कारंजा शहरातील गुरूमंदिर तिर्थक्षेत्र विकासासाठी ८९३ कोटींच्या कामांना उच्च स्तरीय समितीची मान्यता

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरातील गुरूमंदिर तिर्थक्षेत्र प्रस्तावित १७० कोटी तर श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रकल्प १ व प्रकल्प २ अशी एकूण ७२३ कोटी रूपयांची मान्यता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीत देण्यात आली. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांसाठी ग्रामविकास व पर्यटन विभागाने सुधारित नियमावली करावी जेणेकरून राज्यातील भागनिहाय महत्व लक्षात घेवून सर्वसमावेशक प्रस्ताव जिल्ह्यांकडून सादर होतील अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र विकास आराखडा बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ,खासदार संजय देशमुख,आमदार सईताई प्रकाश डहाके यासह हे विविध देवस्थान मंदिराचे कार्यवाहक उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरातील गुरूमंदिर तिर्थक्षेत्र विकास आणि श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रकल्प १ व प्रकल्प २ च्या कामांना आज मान्यता देण्यात आली आहे ही कामे गतीने करण्यासाठी संबधित विभागांनी कार्यवाही करावी.नागपूर,नंदनवन ले-आऊट येथील लक्ष्मीनारायण व शिव मंदिर परिसराचा सुशोभिकरण व पुर्नविकास करणे,नागपूर भांडेवाडी येथील श्री मुरलीधर मंदीत तिर्थक्षेत्राचा विकास करणे तसेच नागपूर शांतीनगर इतवारी रेल्वे स्टेशनजवळील कुत्तेवाला आश्रमाचे सुशोभिकरण आणि विकास करण्याबाबत कामांना उच्च स्तरीय समितीने मान्यता दिली असून ही कामे गतीने करा.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे सादर करताना कमीत कमी खर्चात चांगल्या दर्जाची कामे करण्यासाठी प्रशासनाने भर द्यावा.कोणताही प्रस्ताव सादर करताना भविष्यातील गरजा आणि त्या परिसरातील आवश्यकता लक्षात घेवून प्रस्ताव सादर केले जावेत.ग्रामविकास, पर्यटन विभाग त्याचप्रमाणे या विषयाशी संबधित इतर विभागांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडा बनविताना नवीन मार्गदर्शक तत्वे जारी करावीत अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

या बैठकीला वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच.गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले,मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव अश्र्विनी भिडे,सचिव डॉ. श्रीकर परदेशी, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी,दूरदृश्यप्रणालीव्दारे वाशिमच्या जिल्हाधिकारी बुवनेश्र्वरी एस यांच्यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र भूषण २०२४ पुरस्कार जाहीर करण्यात आला असून देशातील नामवंत शिल्पकार आणि महाराष्ट्र पुत्र राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत विधानसभेत घोषणा केली. राज्य सरकारकडून 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण २०२४ पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे. राम सुतार यांचं वय १०० वर्ष आहे, आजही ते शिल्प तयार करतात अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली. विशेष म्हणजे गेल्याच महिन्यात राम सुतार यांचा १०० वा वाढदिवस साजरा करण्यात आला आहे.



राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मुक्त शिल्पकार आहेत. यांचा जन्म इ.स.१९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे झाला होता. देशभरात त्यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. त्यामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटी या देशातील सर्वात उंच शिल्प पुतळ्याचे कामही त्यांनीच केले आहे. राम सुतार हे नामवंत वास्तुविशारद असून त्यांच्या कारकिर्दीच्या गेल्या चाळीस वर्षात पन्नासहून अधिक भव्य शिल्पे तयार केली आहेत. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. राम सुतार यांनी जेजे स्कूल ऑफ ओरिएंटमधून आपले शिक्षण पूर्ण केले असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणासोबत त्यांनी वेरूळ गुंफांमध्ये काम केले. त्यानंतर, काही वर्षांनी त्यांनी स्वतःचा शिल्पकला व्यवसाय सुरू केला. १९५२ मध्ये त्यांचे प्रमिलाशी लग्न झाले आणि त्यांच्याप्रमाणेच त्यांचा एकुलता एक मुलगा अनिल सुतार (१९५७ मध्ये जन्म) देखील एक शिल्पकार आहे आणि त्याने त्यांच्या वडिलांसोबत पुतळ्याच्या डिझाइनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मला भारतातील रॉकेट प्रक्षेपण स्थळावर एक मूर्ती बनवायची आहे, असे त्यांनी यापूर्वी म्हटले होते.

# मतदार संघातील जलजीवन योजनेतील गैरप्रकार पोहोचला विधानभवनात

## आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला प्रश्न उपस्थित : एकाच कंत्राटदाराला तब्बल २८ कंत्राट ; जल जीवन मिशन योजनेच्या कामाची पोलखोल

**मला जाताना सरणावर कळले होते... मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते...ही दुनिया पाषाणाची बोलून बदलली नाही, बहर येथे शब्दाचे बहरले होते.या ओवी गाऊन शेतकऱ्यांचे वास्तव चित्र विधानसभेत उभे केले.**




**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर : जल हे जीवन आहे. त्यामुळे शासनाने जलजीवन मिशन योजना राबवून घराघरात शुद्ध जल पोहोचवण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून मेहकर लोणार तालुक्यामध्ये तब्बल दीडशेच्या वर जल जीवन मिशन योजनेच्या कामांना प्रशासकीय मंजुरात दिली आहे. यावर हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च करण्याची तयारी ठेवली आहे. मात्र, असे असताना मेहकर विधानसभा मतदारसंघात जल जीवन मिशन योजना ही मतदार संघातील नागरिकांसाठी संतापाची योजना बनली आहे. या योजनेतून अधिकारी कंत्राटदार गब्बर होत असून जनता मात्र पाण्यासाठी तरसत आहे.जल जीवन मिशन योजनेच्या कामात गैरप्रकाराची ही हद्द ओलांडली आहे. एकाच कंत्रालदाराला तब्बल २८ कंत्राट देत प्रशासकीय यंत्रणेने आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. या संतप्त प्रकाराबाबत मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानभवनात प्रश्न उपस्थित करीत याकडे शासनाचे लक्ष वेधून दोषीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.**

मेहकर - लोणार मतदार संघातील मेहकर तालुक्यात ९२ ठिकाणी जलजीवन मिशन योजनेची कामे करण्यास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. तर, लोणार तालुक्यात ६० च्या वर ठिकाणी जलजीवन मिशन योजनेच्या अंतर्गत कामे करण्यास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सन २०२२ पासून या कामांना कार्यारंभ आदेश मिळाला असतानाही दीडशे पैकी चार पाच ठिकाणची कामे वगळता इतर कामेही अद्यापही पूर्ण झालेली नाहीत.त्यामुळे मायबाप जनतेला पाण्यासाठी रखरखत्या उन्हात रानोमाळ भटकंती करावी लागत आहे. एकीकडे शासन कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून जनतेला सुविधा देण्याचे काम करीत आहे. तर, दुसरीकडे प्रशासनातील भ्रष्ट वृत्तीच्या लोकांनी जल जीवन मिशन योजनेच्या उद्देशाला नख लावून सदर योजना गिळंकृत करण्याचा प्रकार मतदारसंघात सुरू आहे. अनेक ठिकाणी पाईपलाईन झालेली आहे. विहिरीचे खोदकाम करण्यात आलेले आहे. मात्र, पाण्याचा सोर्स नाही, असे असताना लाखो रुपयांची निधी व्यर्थ खर्च करण्यात आला आहे. शासनाकडे सर्व सुविधा असताना प्रशासनातील काही भ्रष्टवृत्तीच्या लोकांमुळे शासनाच्या या उदात्त हेतुला तडे जात आहे.याकडे आपण लक्ष देऊ मेहकर -लोणार मतदार संघातील जलजीवन मिशन योजनेच्या कामात झालेल्या प्रचंड गैरप्रकाराची चौकशी करून संबंधित अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करावी, काम न करता देयक लाटणाऱ्या कंत्राटदाराकडून शासकीय निधीची रक्कम वसूल करावी, अशी मागणी यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानभवनात विरोधी पक्षाच्या २९३ प्रस्तावाबाबत बोलताना मतदारसंघातील समस्या बाबत शासनाचे लक्ष वेधले.

## शेतकरी आत्महत्या; शेतकऱ्यांच्या मदतीकडे वेधले लक्ष

निवडणूक काळात सत्ताधारी पक्षांनी विविध प्रकारच्या आश्र्वासने देत सत्ता काबीज केली आहे. मात्र, सध्या कापूस, धान, सोयाबीन या शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांना मदत करणारे सरकार आहे असे आश्र्वासन दिले होते. मात्र, सोयाबीन कापसाची नाफेड द्वारे खरेदी बंद करून शासनाची शेतकऱ्यांची आर्थिक लुट सुरू आहे. मायबाप म्हणून भूमिका निभावणाऱ्या शासनाने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. विदर्भ मराठवाड्यात वर्षाला जवळपास २ हजार ७ च्या आत्महत्या होत आहेत. सरासरी एव्हरेज काढला तर वर्षाला ३ हजार आत्महत्या होत असून १९९५ ते २०२५ पर्यंत तब्बल ९० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. देऊळगाव राजा तालुक्यातील उत्कृष्ट शेतकरी म्हणून राज्यपालाच्या हस्ते शासनाचा पुरस्कार प्राप्त केलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. आत्महत्या करताना त्यांनी तब्बल चार पानाचे चिठ्ठी लिहून शेतीसाठी पाणी मिळत नाही म्हणून आत्महत्या केल्याचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांनी माझ्या तीन मुलांचे पालकत्व स्वीकारावे, पत्नीला शासकीय नोकरी द्यावी. अशी चिठ्ठी लिहून शासनाचे




पुतळा मावशीचे प्रेम उघड केले आहे. याबाबतही आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेचे लक्षवेधून शेतकऱ्यांच्या समस्या निकाली काढण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी मला जाताना सरणावर कळले होते... मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते... ही दुनिया पाषाणाची बोलून बदलली नाही, बहर येथे शब्दाचे बहरले होते.या ओवी गाऊन शेतकऱ्यांचे वास्तव चित्र विधानसभेत उभे केले. तसेच मतदारसंघात जल जीवन मिशन योजना ही योजनेने संतापाची लाट आली असून एकाच कंत्राटदाराला तब्बल २७ कंत्राट अधिकाऱ्यांनी दिले. याकडे लक्ष वेधले. त्याचबरोबर सोर्स नसताना विहिर खोदण्यात आली आणि निधी चा दुरुपयोग करण्यात आला असे मत यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी त्यांनी व्यक्त केले.त्याचबरोबर मतदारसंघातील सप्त ऋषी तीर्थक्षेत्राकडे जाणाऱ्या फॉरेस्ट जमिनीवरील रस्त्याबाबत प्रशासनाने परवानगी द्यावी, मतदारसंघातील समस्या तात्काळ निकाली काढाव्या आणि न्याय द्यावा अशी मागणी यावेळी आमदार खरात यांनी विधानसभेत केली.

## चिमण्यांसाठी एवढे कराच!

दरवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही हा दिवस जगभर उत्साहात साजरा केला गेला. चिमणी या चिमुकल्या पक्षासाठी व त्याचा संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाटयाने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वात जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात, बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यातून एकदा दोन चार अंडी घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यासारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाटयाने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल. पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्वाचे त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यासारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करुन चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा.

# शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड येथील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करणार – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय कराड येथील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणाचा चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कारवाई केली जाईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी विधानसभेत सांगितले.

या लक्षवेधीच्या उत्तराच्या वेळी अधिक माहिती देताना मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले, या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. फहिम जहांगीर सय्यद यांना २५ लाख इतका घर बांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले होता. डॉक्टर सय्यद या सेवेत असताना त्यांचा मृत्यू झाल्याने शासन नियमानुसार त्यांच्या घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची रुपये ८ लाख ४९ हजार २३ रुपये इतकी रक्कम क्षमापित करण्यात मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना मंजूर करण्यात आलेल्या आक्रम पैकी शिल्लक मुद्दल ९ लाख ६ हजार २५० रुपये त्यांना ते असलेल्या मृत्यु-नि-सेवा उत्पादनातून वसूल करण्यात आले. मात्र या महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य यांनी डॉ. सय्यद यांच्या मुद्दल व व्याजाची रक्कम असे १७ लाख ५५ हजार २७३ इतकी रक्कम त्यांच्या वारसा कडून धनादेशद्वारे मागणे हे नियमबाह्य आहे. याबाबत डॉ. सय्यद यांच्या वारसांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाच्या आदेशानुसार, कॉलेज प्रशासनाने हे पैसे डॉ. सय्यद यांच्या वारसांना परत करणे आवश्यक आहे. डॉ. सय्यद यांच्या वारसा वसूल करण्यात आलेली रक्कम प्रकरणासंदर्भात



तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.

तसेच महाविद्यालयाच्या ताब्यात असणारी जागे संदर्भातही आपण स्वतः लक्ष घालून हा विषय मार्गी लावला जाईल असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री पाटील यांनी सांगितले. या संदर्भात सदस्य महेश शिंदे यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती.

# क्रिकेटपटू, उद्योगपती, अभिनेता कोणालाच नाही सोडलं; 'या' सुप्रसिद्ध अभिनेत्रीच्या अफेअरनं बॉलिवूड हादरलं

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** दक्षिण भारतीय सिनेमातील दिग्गज अभिनेत्री अनुष्का शेट्टी तिच्या अभिनय कौशल्यासाठी आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वासाठी ओळखली जाते. 'बाहुबली' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांमधून अनुष्काने प्रेक्षकांचं मन जिंकलं आहे, परंतु अनुष्काच्या वैयक्तिक जीवन जाणून घेण्यासाठी तिचे चाहते उत्सुक असतात. शिवाय तिचं वैयक्तिक जीवन हे नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे.

अनुष्का शेट्टी ४३ वर्षांची असून अजून सुद्धा ती अविवाहित आहे. तर तिच्या रिलेश्नशिपबद्दल अनेक गॉसिप आणि अफवा देखील पसरल्या जात आहेत. अशातच अनुष्का तिच्या सिंगल लाईफमुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

अनुष्काच्या 'या' दिग्गजांसोबत अफेअरच्या चर्चा?

अनेक वेळा अनुष्काच्या रिलेषनशिपबद्दल चर्चा रंगत असतात. अनुष्काच्या नावा पुढे क्रिकेटपटू, उद्योगपती आणि अभिनेत्यांची नावं जोडली गेली आहेत. या यादीत प्रभास, नागार्जुन, चरणजीत सिंग, सूर्या, विशाल कृष्ण आणि कृष्ण वामसी यांचा समावेश आहे. मात्र या अफेअरच्या चर्चांनंचर पुढे तिच्या आयुष्यात एकही नात लग्नापर्यंत गेलं नाही. सध्या अनुष्का ४३ वर्षांची आहे पण ती अद्यापही सिंगलच आहे. ती तिच्या आयुष्यात खऱ्या प्रेमाच्या शोधात आहे असंच दिसून येत आहे.

खऱ्या प्रेमाच्या शोधात-

अनुष्का शेट्टी कायम तिच्या अभिनयामुळे ओळखली जाते. मात्र, अनुष्काचं वैयक्तिक जीवन हे कायमच एक रहस्य राहिलेलं आहे. तिने अनेक वेळा स्पष्ट केलं आहे की ती खऱ्या प्रेमाच्या शोधात आहे आणि तिला योग्य साथीदार सापडेपर्यंत लग्न करण्याचा विचार ती करणार नाही. तिच्या अफेअर्सच्या अफवा आणि गॉसिपच्या मध्येही, अनुष्काने नेहमी तिच्या कामावर फोकस ठेवला आहे. अनुष्का ही केवळ एक प्रतिभाशाली अभिनेत्री आहेत, तर ती एक यशस्वी उद्योजिका देखील आहे. तिने अनेक चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे आणि तिच्या व्यवसायिक उपक्रमांमुळे ती अब्जाधीश देखील झाली आहे. तिच्या आर्थिक स्थिती आणि पेशागत यश हे तिच्या अविवाहित जीवनात एक महत्त्वाचा पैलू आहे.

## गोंड राजे बख्त बुलंद शाह समाधी स्थळ सुशोभीकरणासाठी नागपूर सुधार प्रन्यासने निधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश- उद्योग मंत्री उदय सामंत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या समाधी स्थळाचे सुशोभीकरण सुधारण्यासाठी व संवर्धन करण्यासाठी ९ कोटी ७२ लाखाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी नागपूर सुधार प्रन्यास ने (छखढ) हा निधी तात्काळ मंजूर करावा, असे निर्देश देण्यात आले असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तराच्या वेळी दिले.

सदस्य भीमराम केराम यांनी यासंदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य प्रवीण दटके यांनीही सहभाग घेतला.

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले, गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या समाधी स्थळी कोणतेही अतिक्रमण नाही. मात्र सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार करून, जर अतिक्रमण असेल तर ते तत्काळ हटवण्याचे आदेश दिले जातील, असे उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले.

# अर्थसंकल्पीय अनुदानावरील मागण्या विधानसभेत मंजूर

## कामगार, उद्योग आणि खनीकर्म विभागाच्या मागण्या

**मुंबई/प्रतिनिधी :** कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागाच्या सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर विधानसभेत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या विभागांच्या अर्थसंकल्पीय अनुदानावरील मागण्या मांडण्यात येवून, त्या मंजूर करण्यात आल्या.



कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल चर्चेला उत्तर देताना म्हणाले, राज्य शासन इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून बांधकाम कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेच्या कल्याणकारी योजना राबवित असते. या योजनांच्या माध्यमातून कामगारांना लाभ देण्यात येत आहे. सामाजिक सुरक्षा कायद्यानुसार असंघटित क्षेत्रातील कामगारांना लाभ देण्यात येते आहे. किमान वेतनाकरिता किमान वेतन समिती गठीत करून किमान वेतन देण्याचे निश्रि्चत करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कामगार विभागाच्या ५२५.४४ कोटी रुपयांच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या.

उद्योग विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले, महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीमध्ये देशात अव्वल आहे. जुलै ते डिसेंबर २०२४ च्या दरम्यान राज्यात १ लाख ३९ हजार ४३४ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. ही देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ४० टक्के गुंतवणूक आहे. दावोस येथील आर्थिक परिषदेतही १५ लाख ७२ हजार ६३४ कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. या कराराच्या माध्यमातून राज्यात मोठ्या प्रमाणावर उद्योग येणार आहेत . या कराराचे उद्योगात रूपांतर होण्यासाठी 'सिंगल विंडो' यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे.

सन २०२५- २६ या आर्थिक वर्षासाठी उद्योग विभागाच्या ७ हजार ९३० कोटी ८० लाख रुपयांच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या.

खनीकर्म विभागासाठी सन २०२५ - २६ या आर्थिक वर्षाकरिता एकूण ४० कोटी ४२ लाख ८९ हजार रुपये रकमेच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या.

अर्थसंकलपावरील अनुदानातील तरतुदीमध्ये अनिवार्य आणि कार्यक्रमावरील खर्चाचा समावेश आहे.

## वाशिम जिल्ह्यात ऑगस्ट- सप्टेंबर २०२४ कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदतीपोटी ७३.८७ कोटी निधी मंजूर - मदत व पुनर्वसन मंत्री



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यात ऑगस्ट व सप्टेंबर २०२४ या कालावधीत अतिवृष्टीमुळे ६५ हजार ४८४ शेतकऱ्यांच्या ५३,८३५.३२ हेक्टर क्षेत्रावरील झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी ७३.८७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी विधानसभेत दिली.या संदर्भात सदस्य सई डहाके यांनी लक्षवेधी उपस्थीत केली होती.

मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी शासन नेहमीच खंबीरपणे उभे राहते. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना जिरायती पिकाच्या नुकसानीसाठी रुपये १३ हजार ६०० प्रति हेक्टर, बागायती पिकाच्या नुकसानीसाठी रुपये २७००० प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकाच्या नुकसानीसाठी रूप ३६००० प्रति हेक्टर मदत देण्यात येते. तसेच ही मदत केंद्र शासनाच्या दोन हेक्टर ऐवजी तीन हेक्टरच्या मर्यादेत वाढवण्यात आली असल्याचे मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले, वाशिम जिल्ह्यासाठी फेब्रुवारी मार्च व एप्रिल २०२४ कालावधीत अवेळी पावसामुळे झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना १४.१५ कोटी इतका निधी प्रत्यक्षात वितरित केला आहे. मे २०२४ या मध्ये अवेळी पावसामुळे झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी ७.१३ लक्ष इतका निधी शेतकऱ्यांना वितरीत केला आहे. तर जून- जुलै २०२४ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी ६९.५४ लक्ष इतका निधी शेतकऱ्यांना वितरीत केला आहे.

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत चंद्रपूरातील ८०० भाविक रामलल्लाच्या दर्शनाकरीता रवाना




**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** जेष्ठ भाविक नागरिकांना, राज्य तसेच देशातील प्रसिध्द तीर्थक्षेत्राचे दर्शन व्हावे, या उद्देशाने राज्य सरकारने मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ८०० भाविकांना घेऊन विशेष ट्रेन अयोध्येकरीता आज रवाना करण्यात आली. चंद्रपूर रेल्वे स्थानकावर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत भाविकांना शुभेच्छा देऊन सदर ट्रेन मार्गस्थ झाली. राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून १९ ते २३ मार्च या कालावधीत सामाजिक न्याय विभागाचा वतीने चंद्रपूर जिल्ह्यातील ८०० भाविकांना अयोध्येतील रामलल्लाचे दर्शन घेता येणार आहे. गत महिन्यात ५ ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत बौध्दगया येथे तीर्थदर्शनाचे नियोजन करण्यात आले होते. यापूर्वी देखील जिल्ह्यातील २०३ पात्र लाभार्थ्यांनी महाबोधी मंदीर (बौद्धगया) येथे दर्शन घेतले होते. अशी प्रतिक्रिया विनोद मोहतुरे, सहायक आयुक्त (समाजकल्याण) यांनी दिली आहे.

# जलनि:स्सारण चर योजनेसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणार- जलसंपदा मंत्री विखे-पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात उद्भवणाऱ्या पाणथळ व क्षारयुक्त जमिनीच्या समस्या सोडविण्यासाठी व या क्षेत्राच्या सुधारण्यासाठी जलनिस्सारण चर योजनेसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणार, असे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

सदस्य डॉ. विश्र्वजीत कदम यांनी यासंदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती. लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य जयंत पाटील यांनी सहभाग घेतला

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले की, जलनिस्सारण चर योजना हा कार्यक्रम पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. पाणथळ व क्षारयुक्त जमिनीचे क्षेत्र निश्र्चित करण्यासाठी विहिरींची पाणीपातळी घेऊन तसेच जमिनींचे माती परीक्षण करून पाणथळ व क्षारपड जमिनी निश्र्चित करण्यात येते. त्यानुसार क्षारपड, पाणथळ क्षेत्र निर्मूलनासाठी खुल्या चर योजना प्रस्तावित केल्या जातात. या कार्यक्रमामुळे महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये ७९९ (२८८२.५४ किमी) योजनांची बांधकामे पूर्ण करण्यात आली आहेत. यामुळे २ लाख २३ हजार १०५ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले आहे.



कृष्णा कालव्याच्या लाभ क्षेत्रामध्ये कराड, वाळवा, पलूस व तासगाव या चार तालुक्यांचा समावेश आहे. कृष्णा कालव्याच्या लाभक्षेत्रात ३३ खुल्या चर योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. यापैकी पलूस तालुक्यात १८ योजना पूर्ण झाल्या असून त्या कार्यान्वित आहेत. या १८ चर योजनांमुळे पलूस तालुक्यातील ३ हजार ३१२ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आदिती तटकरे यांच्या हस्ते सुवर्ण महोत्सवी गगनभरारी कार्यक्रमाचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने सुवर्ण मोहोत्सवी गगनभरारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे वनमंत्री गणेश नाईक, कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची देखील कार्यक्रमाला उपस्थिती होती. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने सुवर्ण मोहोत्सवी गगनभरारी कार्यक्रमाचे नवी मुंबईत आयोजन करण्यात आले असून राज्यभरातील महिला बचत गटांनी या कार्यक्रमात घेतला सहभाग आहे. या मोहोत्सवात राज्यातील अनेक महिला बचत गटांनी स्वतः बनवलेल्या उत्पादनाचे स्टॉल लावले आहेत. प्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांच्या गाण्यानी या कार्यक्रमात मनोरंजन केले आहे.




नवी मुंबईतील वाशी एक्जीबिशन सेंटर मध्ये राज्य सरकारच्या महिला व बाल विकास महामंडळाच्या माध्यमातून माविम सुवर्ण महोत्सव सुरू असून या कार्यक्रमात महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, माविम राज्य सरकारच्या अंतर्गत काम करते. आम्हाला अधिकाधिक महिलांना सक्षम करायचे आहे.

या कार्यक्रमात अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.२० लाख महिला माविम ला जोडल्या आहेत. त्या ५० लाख करण्याचा आमचा प्रयत्न आहे.याच्या माध्यमातून लाडकी बहिण योजना आणून महिलांना अधिक सक्षम केले आहे. पुढेही करणार आहोत. असे मत व्यक्त केले. तर, वनमंत्री गणेश नाईक यांनी समृद्धी महामार्गावर ज्या ठिकाणी शौचालय आहेत. त्या ठिकाणी महिलांना सेंटर काढून दिले जावे हा त्यांचा प्रस्ताव आहे. त्याला माझा पाठिंबा आहे. सिडको, एमआयडीसी माध्यमातून आपण विकास करण्याचा प्रयत्न करत आहोत.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत असून, त्यांचे लोकार्पण लवकरच होणार आहे. त्यातही महिलांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न असेल. तर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण ही लवकर होईल.नवी मुंबई १५ लाख वस्ती असून १६ लाख झाडे आहेत.त्यामुळे लवकरच आणखी त्यांची वाढ केली जाईल. अशी माहिती गणेश नाईक यांनी दिली.

## संक्षिप्त...

### नागपूर घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पोलीस दल अलर्ट मोडवर



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** औरंगजेबच्या कबरीवरून सध्या राज्यभरात वातावरण तापलेले असून, नागपूर येथे झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर संभाजीनगर जिल्ह्यातही पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर आहे. शहरात ३०० अधिकाऱ्यांसह सुमारे ३ हजार पोलिसांचा तर ग्रामीण भागात अडीचशे अधिकाऱ्यांसह २ हजार पोलिसांचा सशस्त्र बंदोबस्त तैनात आहे. कोणीही कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करू नये अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा शहर पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिला.

नागपूर मध्ये औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरून हा सर्व राडा झाला आहे तर वाहनांची तोडफोड, वाहने पेटवून देणे, दगडफेक अशा घटना घडल्या. त्याच पार्श्र्वभूमीवर संभाजीनगर शहरासह जिल्ह्यात रात्रीपासून वेगवेगळ्या भागांत बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. पोलिस ठाण्यांच्या प्रमुखांनी घडामोडींवर बारकाईने नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, संवेदनशील भागांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### अंबाजोगाई येथील मारहाण प्रकरणात तिघांविरोधात गुन्हा दाखल, व्हायरल व्हिडिओ नंतर पोलिसांकडून दखल



**बीड/प्रतिनिधी :**बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील दस्तगीर वाडी येथील कृष्णा साळे या मुलास तिघेजण मारहाण करत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या प्रकरणात सुरुवातीला कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. मात्र, घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच, त्याची दखल पोलिसांनी घेतली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात माऊली माने, कुणाल घाडगे, शुभम घाडगे या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या तिघांनी कृष्णाला एकटे घाटात दारू पिण्यासाठी पैसे दे म्हणत मारहाण केली. तसेच तू आता गावातच राहायचे नाही... अशी धमकी देखील दिली.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणात गुन्हा नोंदविण्याची मागणी केली जात होती. रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला असून, एकाला ताब्यात घेतले आहे. मात्र इतर दोघे अद्याप फरार आहेत.

### केडीएमसीचा तीन हजार तीनशे कोटींचा अर्थसंकल्प सादर

**कल्याण/प्रतिनिधी :** आज केडीएमसी आयुक्तांनी तीन हजार तीनशे कोटींचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही कर दरवाढ नसल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तर या अर्थसंकल्पात शिक्षण व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापनाची चांगली सुविधा, उद्यान व इतर नागरिकांच्या सोयी सुविधासाठी तरतूद केलेली आहे. कल्याण डोंबिवली शहरात विविध रस्ते व फुलांचे काम सुरू आहेत त्याला गती देण्यासाठी विविध उपाययोजना बजेटच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या सुविधांसाठी इ गव्हर्नन्स वर देखील भर देण्यात आल्याचे आयुक्त इंदुराणी जाखड यांनी सांगितले.



### सायबर पोलिसांचा सोशल मीडिया सेल सतर्क, वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या ८ जनावर गुन्हे तर ८० जणांना नोटीस

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगरात विविध धार्मिक, राजकीय मुद्द्यांवरून सोशल मीडियावर केलेल्या वादग्रस्त पोस्टवर पोलिस बारकाईने लक्ष ठेवून आहेत. वादग्रस्त पोस्ट, कमेंट करणाऱ्या शहरातील ८ जनावर गुन्हे दाखल करण्यात आले असून, ८० पेक्षा अधिकांना पोलिस आयुक्तालयात बोलावून तंबी देण्यात आली आहे. तर,५०६ पोस्ट डिलिट करण्यात आल्या आहेत. राज्यभरात सध्या औरंगजेबाच्या कबरीवरून वादंग उठले आहे. त्याचा सोशल मीडियावर परिणाम होतांना दिसत आहे.यामुळे सायबर पोलिस ठाण्याच्या सोशल मीडिया सेलचे अंमलदार सतत अशा वादग्रस्त, धार्मिक तणावाच्या पोस्ट करणाऱ्यांचा शोध घेत आहेत.



### परवाना शुल्क वाढवल्याने परमिट रूम चालकांचा संप, जिल्ह्यातील ६०० पेक्षा अधिक व्यावसायिक बंदमध्ये सहभागी




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शासनाकडून परमिट रूम मधील मध्यविक्रीवर १०% व्याज टॅक्स मध्ये तर परमिट रूम परवाना २०२५-२६ नूतनीकरण शुल्कात १५ टक्के वाढ करण्यात आली आहे. शासनाने केलेल्या दरवाढी विरोधात छत्रपती संभाजीनगर जिल्हा हॉटेल आणि रेस्टॉरंट मालक संघटनेच्या वतीने आज बंद पुकारण्यात आला. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा बंद पाळण्यात येणार असल्याचं संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. या बंदमध्ये जिल्हाभरातील जवळपास ६०० पेक्षा अधिक व्यावसायिक सहभागी सहभागी झाले. यावेळी महाराष्ट्र व्हॅट टॅक्स धोरणाचा निषेध नोंदवत दरवर्षी वाढणारा परवाना नूतनीकरण शुल्क रद्द करा, मद्य विक्रीतून शासनाचा महसूल वाढवण्यासाठी मद्य निर्मितीवर टॅक्स लागू करण्याची आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

### रिक्षा चालकांकडून प्रवाशांची चाललेली लूट थांबवण्यासाठी राष्ट्रवादीने दिले पोलीस उपायुक्तांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिर्धी :** भिवंडी शहरात अंतर्गत भागीदारी पद्धतीने चालणाऱ्या रिक्षा बेकायदेशीर पद्धतीने प्रत्येक प्रवासी यांच्या कडून १५ रुपये प्रति भाडे आकारात आहे. ते पूर्णपणे गैर कायदेशीर असून त्यांना अशा कोणत्याही प्रकारचे प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे यांच्याकडून परवानगी देण्यात आलेली नाही. सध्या रिक्षाचे मीटर २३ रुपये असून, ते २६ रुपये होणार आहे. याच प्रमाणे भागीदारी पद्धतीने रिक्षा चालवत असणाऱ्या प्रत्येक दहा रुपये प्रति प्रमाणे प्रवासी भाडे आकारल पाहिजे. परंतु भिवंडीतील रिक्षा चालक कायदेशीर कोणतीही परवानगी न घेता प्रत्येक प्रवासी कडून सध्या पंधरा रुपये प्रमाणे दर आकारत आहे. ते चुकीचे असून भिवंडीतील जनतेची सरळ लूट करत असून या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी पोलीस उपायुक्त यांना भेटून निवेदन सादर केले आहे.



### भाजप नेते किरीट सोमय्यांनी घेतली जालना जिल्हाधिकाऱ्यांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात बांग्लादेशींना देण्यात आलेल्या ८५५१ जन्म प्रमाणपत्रांपैकी ३५९५ जन्मप्रमाणत्र रद्द करण्यात आल्याची माहिती भाजप नेते किरीट सोमया यांनी दिली आहे. किरीट सोमय्या यांनी आज जालन्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेऊन चर्चा केलीये. जिल्ह्यात अंबड भोकरदन जालना आणि परतूर तालक्यातून बांग्लादेशींना प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज आले आहेत. त्यात ३५९५ अर्ज हे रद्द करण्यात आलेत तर उर्वरित अर्जांपैकी ७० टक्के अर्ज रद्द होतील असंही सोमय्या यांनी म्हंटलंय. त्याचबरोबर आतापर्यंत २४ ठिकाणी एफआयआर दाखल झाले असून, अकोल्यात ५३ लोकांना अटक झाली आहे. तर मालेगावात ३८ जण फरार आहेत. दरम्यान, दिशा सालियान मृत्यू प्रकरणी वडिलांचं समाधान होईपर्यंत तपास झाला पाहिजे. याचा निर्णय न्यायालयानं करायला हवाय. वडिलांचा संशय आहे ही आत्महत्या नसून हत्या आहे. याचा तपासावर न्यायालयानं निर्णय घ्यावा शासन तपास करायला तयार आहे. असं सोमय्या यांनी म्हंटलं आहे. त्याचबरोबर नागपूरमध्ये घडलेला हिंसाचाराचा बांग्लादेश आणि मालेगाव कनेक्शन असल्याचंही सोमय्या यांनी म्हंटलं आहे.




# सोयाबीनसह इतर धान्यांची चोरी करणारी टोळी पोलिसांनी केली जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

## चार जण पोलिसांच्या ताब्यात तर तीन चोरटे फरार

**जालना/प्रतिनिधी :** मागील काही महिन्यांपासून धान्य चोरी करणारी टोळी जिल्ह्यात चांगलीच सक्रीय झाली होती. याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यापासून स्थागुशा चे पथक या टोळीवर तिरपी नजर ठेऊन होते. धान्य चोरी करणाऱ्या टोळीचा माग घेत असताना पोलीसांना खबऱ्यामार्फत या टोळीची माहीती मिळाली होती. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला असता. सदरील टोळीतील चार सांशयित आरोपी धान्यासह पोलीसांच्या हाती लागले. बळीराम रावसाहेब कुटे (वय २३ वर्षे) रा.उमरखेड ता. भोकरदन, संदिप गणेश वाघमारे (वय ३२ वर्षे),रा. सावखेड ता. दे.राजा,आनंद ऊत्तम मोरे (वय ३२ वर्षे) रा. मंठा,प्रकाश राजू झिने (वय २२ वर्षे) रा. लोणगाव ता. भोकरदन या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोयाबीन व ईतर धान्यांच्या चोरीच्या गुन्ह्यामध्ये ताब्यात घेण्यात आले असून, या टोळीतील तीन आरोपी सध्या फरार आहेत. हे सात आरोपी दोन टोळ्यामार्फत जिल्ह्यामध्ये धान्य चोरीच्या घटनांमध्ये कार्यरत होते. या दोन्ही टोळींनी जाफराबाद येथे दोन, मौजपुरी येथे तीन,बदनापुर एक,भोकरदन एक,आणि मंठा एक, अशा प्रकारे एकुण आठ धान्य चोरीचे गुन्हे ऊघडकीस अले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. हे धान्य चोरट्याने शेतकऱ्यांच्या शेतातून तर काही चोरी गोडाऊन मधून केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चार आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून सोयाबीन,हरभरा,तूर,गहू,ज्वारी असे एकुण ३ लाख २७ हजाराचे धान्य जप्त करण्यात आले असून गुन्ह्यात वापरलेली एक स्विफ्ट कार व पिकअप वाहन हे साडेसात लाखाचे वाहन असे एकुण १० लाख ७७ हजाराचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केले आहे. तर एकूण चोरी झालेल्या मालापैकी जवळपास पन्नास टक्के माल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलीस सुतूराकडून मिळाली. सदरील कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंज जाधव यांच्या पथकाने केली आहे.



# बंद पडलेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात ग्रामस्थ पोहचले कार्यालयावर

# आधी सा.बा.विभाग नंतर नगर पालिकेवर धडकले

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरातील एमएसईबी चौक ते आळसना गाव या रस्त्याच्या बांधकामाला वर्षभरापूर्वी सुरुवात झाली मात्र अद्याप पर्यंत हे काम असल्याने रस्त्याची चाळणी झालेली आहे यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रस्त्याचे काम तात्काळ सुरू व्हावे यासाठी आज गुरुवारी माजी नगरसेवक दिनेश शिंदे यांच्या नेतृत्वात आळसना येथील गावकरी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपालिका कार्यालयावर धडकले होते...


वर्षभरापूर्वी उद्घाटन होऊन शेगाव आळसणा या रस्त्या च्या कामाला सुरुवात झाली कंत्राटदाराने रस्त्याचे दोन्ही बाजू खोदूनही टाकले व काम बंद पाडले. आता वर्षभराचा कालावधी उलटला तरी काम होत नसल्याने आणि या रस्त्यावर वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने याशिवाय दिवसेंदिवस अपघात वाढत चालल्याने त्रस्त होऊन आळसना येथील गावकरी व या रस्त्यावर राहणारे नागरिक माजी नगरसेवक दिनेश शिंदे यांच्या नेतृत्वात गुरुवारी शेगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर धडकले होते. या ठिकाणी नगरपालिकेच्या पत्रामुळे काम थांबले असल्याचे सांगितल्याने संतप्त नागरिक मुख्याधिकारी सौ जयश्री काटकर यांच्या भेटीसाठी पालिकेत पोहोचले. यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तात्काळ पत्र देण्याचे कबूल केल्यानंतर नागरिक शांत झाले. आता सार्वजनिक बांधकाम विभागाला सोमवार पर्यंत काम सुरू करण्याची मुदत देण्यात आली असून कामाला सुरुवात झाली नाही तर मंगळवारी या रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा माजी नगरसेवक दिनेश शिंदे यांच्यासह गावकऱ्यांनी दिला आहे.






## विविध वृत्त...

### महामार्गावर शोभेसाठी लावले का पथदिव्यांचे खांब? चक्करबर्डी परिसरात संपूर्ण अंधार



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** नागपूर सुरत राष्ट्रीय महामार्गावर जवळपास पुर्ण झालेला आहे. पथदिव्यांचे खांब लावलेले असूनही त्यावर मात्र दिवे लावलेले नाही. ही स्थिती एक तप उलटूनही कायम आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतर महामार्गावरचे दिवे सुरु करणार का? असा संतप्त सवाल शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित करत संबंधित महामार्ग अधिकाऱ्याला चांगलेच धारेवर धरले. आज लवकरात लवकर दिवे सुरु करण्याची मागणी केली. दरम्यान, काही दिवसांत दिवे सुरु न झाल्यास आंदोलनाचा इशारा शिंदे सेनेकडून देण्यात आला आहे.

### रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात एकाच दिवसात हुल्लडबाजांवर कारवाई करत ४ लाख ५८ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** रंगपंचमीच्या पार्श्र्वभूमीवर कोल्हापुरात एकाच दिवसात हुल्लडबाजांवर कारवाई करत तब्बल साडेचार लाख रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. कोल्हापूर शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडून ६०४ केसेस अंतर्गत ४ लाख ५८ हजार ९०० रुपयांची दंड कोल्हापूरकरांकडून वसूल करण्यात आलाय. यामध्ये मद्यपान करुन वाहन चालवण्याच्या २२ केसेस, ट्रिपल सीटच्या १९४ केसेस, वाहन चालवताना मोबाईलवर बोलण्याच्या ४५ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

### ग्राहकांना न विचारता वीज मीटर बदलण्यात येत असल्याने मनसेचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील वागळे इस्टेट येथील एमएसइबी च्या मेन ऑफिस मधून ग्राहकांना न विचारता त्यांची वीज मिटर बदलत आहेत. हे मिटर बदलण्याचे काम करणाऱ्या व्यक्तींकडे ओळखपत्र नाही. शिवाय १५००० रु ची मागणी केली जात आहे. पण अशा प्रकारचे कोणतेही पत्रक त्यांनी दाखवलेले नाही. म्हणून या संदर्भात जाब विचारण्यासाठी मनसे नेते अविनाश जाधव यांच्या नेततृत्वाखाली ठाणे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे व तक्रार दार मंदार भट यांनी महावितरणचे वरिष्ठ अधीक्षक अभियंता युवराज मेश्राम यांची भेट घेतली व सदर विषयात लक्ष घालावे व येणाऱ्या कर्मचारी हे ओळखपत्रासह असावेत तसेच ग्राहकांना न विचारता अशा प्रकारे लाईट मिटर बदलू नयेत अशा सूचना देण्यात याव्यात अन्यथा मनसे त्यांना जाब विचारेल असे मनसे नेते अविनाश जाधव यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

### कोरटकरने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केलाय,त्याच्यावरील गुन्ह्यात आणखी एक कलम वाढवण्यासाठी सावंत यांची मागणी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवशंभूबद्दल अवमान आणि इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंतांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरचा अटकपूर्व जामीन कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळलाय. यानंतर सध्या फरार असलेल्या प्रशांत कोरटकरचा शोध जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस घेत आहेत. कोरटकरने याआधीच आपला मोबाईल पोलिसांच्या ताब्यात दिला असला तरी त्यातील सर्व डेटा डिलीट करण्यात आलाय. त्यामुळे कोरटकरने पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केलाय, असे म्हणत त्याच्यावरील गुन्ह्यात आणखी एक कलम वाढवण्यासाठी इंद्रजीत सावंत आणि शिवप्रेमींनी जुना राजवाडा पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे.

## नागपूर महापालिकेतील ऐवजदार सफाई कामगारांच्या नियमितीकरणाबाबतत शासन सकारात्मक - उद्योग मंत्री सामंत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर महानगरपालिकेमध्ये कार्यरत ऐवजदार सफाई कामगारांच्या नियमितीकरण संदर्भात शासन सकारात्मक असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरावेळी सांगितले. सदस्य प्रवीण दटके यांनी या संदर्भातील लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य मनीषा चौधरी यांनी सहभाग घेतला.



मंत्री उदय सामंत यांनी सांगितले, ऐवजदार सफाई कामगार हा संवर्ग (कॅटेगिरी) फक्त नागपूर महानगरपालिकेतच आहे. यामध्ये २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या ३८३३ पात्र ऐवजदार कर्मचाऱ्यांन अधिसंख्य पदावर सामावून घेण्यात आलेले आहे. २० वर्ष पेक्षा कमी सेवा झालेले ४२९ कर्मचारी ऐवजदार पदावर सध्या कार्यरत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेत सात हजार आपत्कालीन पदांसाठी मंजुरी दिली आहे. या पदांवर पात्र ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांना घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना लाड पागे समितीचे लाभ मिळतील, असेही त्यांनी सांगितले.

## मलकापूर सोलापूर महामार्गावर शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**जळगाव राजा :** जळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथील शेतकरी कैलास नागरे यांनी सिंचनासाठी पाणी मिळावे या मागणीसाठी आत्महत्या केली होती. याच मागण्यांची राज्य सरकारने त्वरित करावी तसेच १४ गावांची पाणीपुरवठा योजना सुरू करावी आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कैलास नागरे कुटुंबाला पंचवीस लाखाची मदत करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव दाखल असून त्याला त्वरित मान्यता देत प्रस्ताव सचिवालयात सादर करावा, यासह शेतकरी कैलास नागरे यांना शहिद दर्जा द्यावा यासह विविध मागण्यांसाठी शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यातील सोलापूर मलकापूर महामार्गावरील अंढेरा फाट्यावर किसान ब्रिगेड आझाद हिंद शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. तर यावेळी शेतकरी स्व. कैलास नागरे यांच्या कुटुंबातील सदस्य ही या आंदोलनात सहभागी झाले आहे.

## नागपूर प्रकरणाची एनआयए अशा संस्थांच्या माध्यमातून चौकशी करावी – किरीट सोमय्या



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** नागपूरमध्ये झालेल्या दंगलीचा सूत्रधार फईम खान हा आहे. याच फईम खानच मालेगाव, बांगलादेशचे देखील कनेक्शन आहे. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान हा फईम मालेगावला जात होता. त्याने स्वतःच्या कार्यालयाच उद्घाटन देखील केलं. मालेगाव येथील व्होट जिहाद फंडिंग घोटाळा मी बाहेर काढला होता. त्यांचे पैसे संघटनेकडे गेले आहे. नागपूर मध्ये जी दंगल झाली त्यासाठी जो सोशल मीडियावर मेसेज आला तो मेसेज बांगलादेश येथून आला होता. यामुळे मी नागपूर, मालेगाव पोलीस आयुक्त व मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे या प्रकरणात एनआयए व त्यासारख्या संस्थांच्या माध्यमातून चौकशी करून या प्रकरणातील कांड बाहेर काढावे.

दिशा सालीयनच्या वडिलांना न्याय मिळत नाही. न्याय मागण्यासाठी त्यांना न्यायालयात जावं लागत आहे. न्यायालयाने जो आदेश दिला तो सर्वांना पाळावा लागेल. मात्र, मुलीच्या वडिलांनी त्यांच्यावर आरोप केले त्यांना देखील स्पष्टीकरण द्यावं लागणार आहे. मग त्यामध्ये ठाकरे असो किंवा इतर कोणीही असू दे त्यांना स्पष्टीकरण द्यावा लागेल

## धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस – उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी दोन हेक्टरच्या मर्यादेत २० हजार रुपयांचा बोनस देण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत वित्त विभागाच्या चर्चेवरील उत्तरात केली.

या बोनसचा लाभ पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. या अर्थसहाय्य वाटप लवकरच करण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्याचे स्थूल उत्पन्न ४९ लाख कोटी ३९ हजार आहे. राज्याची महसुली तुटी १ टक्क्यांच्या आत आहे. राज्याचा खर्च ७७.२६ टक्के झाला आहे. पुढील वर्षी २०२५ – २६ मध्ये १०० टक्के महसूल जमा करण्याचे शासनाचे उद्दिष्ट राहणार आहे. राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातूनही याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या माध्यमातून उत्पन्न वाढवण्यासाठी केरळच्या धर्तीवर उपाययोजना सुचविण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येईल. या समितीचे अध्यक्ष सदस्य सुधीर मुनगंटीवार असतील. समिती गठित झाल्यानंतर एक महिन्याच्या आत समिती अहवाल सादर करेल.

धान खरेदीच्या संदर्भामध्ये उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, याबाबत ३१ मार्चपर्यंत बैठक घेण्यात येईल. धान खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासन सर्वतोपरी कार्यवाही करेल. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून पाणंद रस्त्यांच्या निर्मितीकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येईल.यामध्ये निधीची कुठल्याही प्रकारची कमतरता ठेवण्यात येणार नाही.

सन २०२५ – २६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात वित्त विभागाकरिता १ लाख ८४ हजार २८७ कोटी रुपये रकमेच्या अर्थसंकल्पीय मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या १३ हजार ८१० कोटी ६७ लाख ५९ हजार रुपयांच्या, नियोजन विभागाच्या कार्यक्रम खर्चासाठी ७ हजार ८८७ कोटी ४५ लाख व अनिवार्य खर्चासाठी २०६ कोटी ५६ लाख तसंच जिल्हा वार्षिक योजनेच्या कार्यक्रमांतर्गत २० हजार १६५ कोटी एवढ्या रकमेच्या अनुदानाच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या.

# उष्माघात टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी

## जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांचे नागरिकांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी :** उष्णतेच्या लाटेत आरोग्याचे रक्षण करण्यासाठी तसेच उष्माघात टाळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केले आहे. नागरिकांनी भरपूर पाणी प्यावे ,शरीराला हायड्रेट ठेवावे,आहार घेतांना हलकं आणि पोषणयुक्त आहार घ्या. फळे, भाज्या, ताक, लिंबू सरबत यांचा समावेश रोजच्या आहारात करावा.जड व मसालेदार अन्न टाळावे जेणे करून आरोग्य खराब होणार नाही.कपडे परिधान करतांना थंड व हलक्या रंगाचे परिधान करावे जेणेकरून शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.सकाळी आणि संध्याकाळीच कामासाठी घराबाहेर पडण्याचा प्रयत्न करा.दुपारच्या वेळेस बाहेर पडू नये.

उष्माघाताची लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी यासंदर्भात जिल्हारुग्णालय ,ग्रामीण रुग्णालय तसेच वैद्यकीय अधिकारी ना सूचना करण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी उष्माघात पासून आपले संरक्षण करण्यासाठी नियम पाळावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केले आहे.

